माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

( द्वितीय अपील यादी सोबत जोडली आहे. )

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नविन प्रशासकीय इमारत,
विधान भवन समोर, पुणे - ४११००१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| सोमनाथ अरुण भोसले | वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय अकलुज, ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |

( सुनावणी दिनांक- दि. २५ / ११ / २०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये ४८ द्वितीय अपिले (सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे) दाखल केलेली आहेत.

१. एकाच अपिलार्थीने एकाच प्राधिकरणाच्या संदर्भात एवढ्या मोठ्या प्रमाणावर द्वितीय अपिले दाखल केलेली असल्याने या अपिलाची सुनावणी दि. २५ / ११ / २०२५ रोजी नेमण्यात आली असल्याबाबत आयोगाकडील नोटीसद्वारे अपिलार्थी व प्रतिवादी यांना कळविण्यात आलेले आहे, त्यानुसार सर्व द्वितीय अपिलावर सुनावणी घेण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणातील सर्व माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी दि. २४.०३.२०२५ रोजी एकूण ४८ माहिती अर्ज दाखल केली असून सदर प्राधिकरणाची विविध विषयांवर माहिती मागितली आहे. या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी सदर प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या बहुतांश प्रथम अपिलामध्ये, मुदत पूर्ण होवूनही आजतागायत माहिती मिळाली नाही, जन माहिती अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत, असे प्रयोजन नमूद केलेले आहे. तसेच आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना बहुतांश व्दितीय अपिलांच्या प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सात दिवसामध्ये माहिती देण्याबाबत आदेश देवूनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

३. सदर सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. अपिलार्थी यांनी जानेवारी २०१५ ते उत्तर देईपर्यंतची सदर प्राधिकरणाची विविध विषयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिल दाखल करताना जन माहिती अधिकारी यांना शीघ्र तथा निशुल्क माहिती देण्याबाबत आदेश द्यावे, जन माहिती अधिकार व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी, तसेच नुकसान भरपाई मिळावी, असे नमूद केले आहे.

४. दि. २५.११.२०२५ रोजीच्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपस्थित जन माहिती



राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या मोठ्या प्रमाणावर वारंवार माहिती अर्ज करण्याच्या कारणाबद्दल तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपील व द्वितीय सादर करण्याच्या प्रयोजनाबाबत विचारणा केली असता त्यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकाच दिवशी ४८ माहिती अर्ज दाखल केल्याने कार्यालयाचे दैनंदिन कामकाजावर विपरीत परिमाण होणार असल्याने तसेच मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ वळवावे लागणार असल्याने अपिलार्थी यांना उत्तर दिले नाही.

५. अपिलार्थी, हे आयोगाकडे मोठ्या संख्येने द्वितीय अपिले दाखल करुन माहिती अधिकार कायद्याचा शस्त्र (Tool) म्हणून वापर करत आहेत. अपिलार्थीस माहिती मिळविण्यात कुठलेही स्वारस्य नाही. अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा सर्रास दुरपयोग करीत असून त्या आधारे विविध शासकीय प्राधिकरणामध्ये दहशत निर्माण करणे हा त्यांचा हेतु आहे. अपिलार्थी हे स्वत:चे स्तोम माजविण्याच्या हेतुने या कायद्याचा अनिर्बंध वापर करून कार्यालयाकडे मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपिल अर्ज केले आहेत, त्यामुळे त्यांचा प्राधिकरणाच्या दैनंदिन कामकाजावर अनिष्ठ परिणाम झाला असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास समक्ष सांगितले.

<u>अपिलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलांची तपासणी केली असता खालील बाब आयोगाच्या निदर्शनास आल्या आहेत.</u>

अपिलार्थी यांनी सार्वजनिक प्राधिकरणाकडे केवळ मोठ्या संख्येने माहिती अर्ज केलेले नसून या सर्व अर्जामध्ये जाणीवपूर्वक विस्तृत स्वरूपाच्या माहितीची मागणी केली आहे. यासंदर्भात सादर केलेल्या सर्व प्रथम अपिलामध्ये " माहिती देण्यास टाळाटाळ केली " असे आणि या संदर्भातील सर्व द्वितीय अपिलावर " जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी, नुकसान भरपाई मिळावी " असे नोंदविले आहे.

आयोगाने या प्रकरणी निर्णयाप्रत येताना, मा.सर्वोच्च न्यायालय, केंद्रीय माहिती आयोग, यांनी विविध प्रकरणात दिलेले न्यायनिवाडे, अधिनियमाची प्रस्तावना, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे युक्तिवाद, त्यांनी सादर केलेले व प्रकरणात उपलब्ध असलेले अभिलेख इत्यादी खाली नमूद केलेल्या बाबी विचारात घेतल्या आहेत.

(१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून अपिलार्थी यांनी वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सादर केलेले माहिती अर्ज, प्रथम अपिले व राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली द्वितीय अपिले यासाठी हेतुत: अवलंबलेली कार्यपद्धती याची पडताळणी अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमूद तत्वांशी करण्यात आली. या अधिनियमच्या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्याअर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्याअर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक

हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्या करिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील ६४५४/२०११ दिनांक ०९.०८.२०११ रोजी Applicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to do their duty-Nation does not want a scenario where 75 % of the staff of public authorities spend 75% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharge ing their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

(३). मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources that are available. Diversion of such

resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility to those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

(४). केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/२०१२/०००८५८-SA ते ०००८७२-SA संदर्भात दिनांक ०४.०७.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

Earlier Obervation of CIC : Shri. M.M.Ansari

" In several occasions earlier the Central Information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat,(Decision No.246/IC(A)2006, FNo.CIC/MA/A/2006/00374 & 375 dated 28 Auguest 2006) the applicant sought documents and specific comments of CPIO on 89 queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-interest, rather than public interest, was dominant, as the appellant had sought redressed of grievances. "

(५). तसेच, मा. शैलेश गांधी यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा कायदेशीर हत्यार म्हणून करीत आहेत, जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे, याबाबत खालीलप्रमाणे निरीक्षण नमूद केले आहे.

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/ SG/ C/ 2011/000760, CIC/SM/2011/000926/SG, CIC/SM/A/2011/ 001111/SG, CIC/SM/ A/2011/002909 dated 17 th January, 2012) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information..... At this juncture the Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual. In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him....The Commission is also conscious of the fact that it is

financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission is wasting public resources."

तसेच असेही नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांचा अंतस्थ व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

(६) राज्य माहिती आयोग, कर्नाटक यांनी अपिलार्थी Davalsab M. Miyanavar यांची एकूण ९६४६ द्वितीय अपिले फेटाळली आहेत. आयोगाच्या या निर्णयाविरूद्ध अपिलार्थी यांनी मा. उच्च न्यायालय, कर्नाटक येथे रिट याचिका क्र. १०१२६० OF २०२४ (GM-RES) Davalsab M. Miyanavar Vs Karnataka Information Commission & Ors. Respondents दाखल केली असून त्यामध्ये मा. उच्च न्यायालय कर्नाटक, (धारवाड बेंच) यांनी दिनांक२५.०९.२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवून रिट याचिका फेटाळली आहे.

" The present case is a classic example of how indiscriminate use of the RTI Act can adversely affect public administration. The petitioner°s actions, if allowed to continue, would not only waste valuable public resources but would also delay the processing of genuine RTI applications filed by citizens seeking information in good faith.

Upon considering the facts and circumstances of this case, along with the relevant judicial precedents, this Court is of the opinion that the petitioner has clearly misused the provisions of the RTI Act. The petitioner's 5 (2020) 5 SCC 481 14 conduct in filing thousands of RTI applications across multiple departments, without any legitimate reason or cause, constitutes an abuse of the process of law. The petitioner°s request to withdraw the writ petition without paying the requisite court fees is not acceptable, as it would set a dangerous precedent and encourage further misuse of the RTI Act.

The registry is directed to take necessary steps to recover the deficit court fee of Rs. 9,64,600/- from the petitioner in accordance with law. The petitioner shall be liable to pay the entire deficit amount as per the objections raised by the office of this Court. "

सदर प्रकरणी निर्णयाप्रत येण्याच्या प्रक्रियेत वरील परिच्छेद क्रमांक (१) ते (६) मधील सर्व बाबी तपशीलवाररित्या विचारात घेता आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद तरतूदीनुसार अपिलार्थीस माहिती

मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी, असा या कायद्याचा मुख्य हेतु आहे. तथापि अपिलार्थी यांनी विपरीत भूमिका घेऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग करण्यासाठी सुनियोजित पद्धतीने अनेक सार्वजनिक प्राधिकरणांकडे जाणीवपूर्वक अतिविस्तृत, दिर्घकालावधीची, मोघम स्वरूपाच्या माहितीची मागणी करण्यासाठी मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपिले व त्यानुषंगाने मोठ्या संख्येने आयोगाकडे द्वितीय अपिले सादर केली आहेत.

२) अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चा वापर करून मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपिले आणि द्वितीय अपिले सादर करण्याच्या या कृतीशी कोणते व्यापक जनहित निगडित आहे हे नमूद केले नाही, याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीत त्यांना संधी दिली असता ते अपिलार्थी सुनावणीस गैरहजर राहले. यावरून अपिलार्थी यांना सदर माहिती मिळविण्यामध्ये कोणतेही तथ्य दिसून येत नाही, त्यांच्या या कृतीशी कोणतेही व्यापक सार्वजनिक हित निगडीत नाही आणि ती या अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमूद केलेल्या तत्त्वाशी विसंगत आहे, ही बाब स्पष्ट आहे.

३) अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (माहिती अधिकार) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक असूनही त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा जाणीवपूर्वक अनिर्बंध व अवाजवी दुरुपयोग केला आहे.

४) अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी वापर केला असल्याने संबंधित शासकीय कार्यालय / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ, साधनसामग्री व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

५) अशा मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्याच्या कार्यपद्धती मुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोध निर्माण होत आहे. त्याचा निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोगाकडील अशा प्रकरणी वेळोवेळी दिलेले, ऐतिहासिक, क्रांतीकारी व लक्ष्यवेधी निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या /प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होत आहे व संबंधित शासकीय खात्यांचा / प्राधिकरणांचा बहुमूल्य वेळ वाया जात असल्याचे दिसून येते. ही बाब माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट

मत झाले आहे.

सदर प्रकरणात असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी उपजिल्हा रुग्णालय अकलुज, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांचेकडे एकाच दिवशी ४८ माहिती अर्ज दाखल केले आहेत. एकाच दिवशी एकाच प्राधिकरणाकडे एवढ्या मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज दाखल करण्याच्या कार्यपद्धतीवरून अपिलार्थी हे संबधित प्राधिकरणास त्रास देण्याच्या उद्देशाने व द्वेष भावनेने माहिती अधिकाराचा सर्रास गैरवापर करत असल्याचे आयोगास मत झाले आहे. यामध्ये अपिलार्थी यांचा काहीतरी अंतस्थ: हेतू असल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांना आजरोजी सुनावणीकामी आगाव सूचना/नोटीस देवूनही ते सुनावणीस कोणतीही पूर्वपरवानगी न घेता गैरहजर आहेत. माहिती अधिकार कायद्याचा सर्रास दुरुपयोग करणाऱ्या अश्या अपिलार्थींना पायबंद घालणे आवश्यक असल्याने तसेच अपिलार्थी यांच्या दाखल केलेल्या द्वितीय अपिलांमध्ये कोणतेही तथ्य किंवा गुणवत्ता आढळून येत नसल्यामुळे व त्यातून कोणतेही जनहित साध्य होत नसल्यामुळे त्यांची सर्व ४८ द्वितीय अपिले कोणत्याहीनिर्देशाविना फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपिलार्थी यांची सर्व ४८ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

---

जा.क्र. 285/2026 दिनांक : 21/1/2026

| अ. क्र. | द्वितीय अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी पदनाम | जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय | प्रथम अपिलीय अधिकारी पदनाम | प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ४ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ५ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ६ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ७ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ८ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ९ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| १० | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ११ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| १२ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| १४ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| १५ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| १६ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| १७ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| १८ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| १९ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २० | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २१ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २२ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २४ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २५ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २६ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २७ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २८ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| २९ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ३० | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ३१ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३२ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ३३ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ३४ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ३५ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ३६ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ३७ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ३८ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ३९ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ४० | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४१ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ४२ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ४३ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ४४ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ४५ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ४६ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ४७ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |
| ४८ | ३९९६-२०२५-सोलापूर | वैद्यकीय अधिक्षक | उपजिल्हा रुग्णालय अकलुज ता.माळशिरस, जि.सोलापूर. | जिल्हा शल्य चिकित्सक | जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, सोलापूर. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ